लोकशास्त्र न्यूज
https://lokshastra news.com

सायंदैनिक
# नाशिक लोकशास्त्र

PRGI No. MHMAR/25/A4847

HAPPY NEW YEAR 2026

* संपादक - भाऊसाहेब हुजबंद, मो. ८९९९९२१९९४ Email- bmhujband@gmail.com

* नाशिक आवृत्ती * वर्ष - पहिले * अंक क्र. - २२ * गुरूवार दि. ०१ जानेवारी २०२६ * पाने - ४ * किंमत - एक रूपया

# धान, भरड धान्य खरेदीकरिता शेतकऱ्यांच्या नोंदणी प्रकियेला ३१ जानेवारी पर्यंत मुदतवाढ

## माजी खासदार समीर भुजबळ यांच्या पाठपुराव्याला यश

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक,दि.३१ डिसेंबर:- माजी खासदार समीर भुजबळ यांच्या पाठपुराव्यातून खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान भरडधान्य खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणी करिता दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. या निर्णयामुळे मका,रागीसह भरड धान्य आणि धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. येवल्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत माजी खासदार समीर भुजबळ यांच्या हस्ते नुकत्याच दोन खरेदी केंद्रांचा शुभारंभ करण्यात आला. यंदाच्या वर्षी मकासह धानाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झालेले आहे. तसेच अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान देखील अधिक झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मका व धानासाठी योग्य दर मिळावा यासाठी शासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या आधारभूत किंमत खरेदी योजनेसाठी मुदतवाढ मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी माजी खासदार समीर भुजबळ यांच्याकडे केली होती. या मागणी नंतर माजी खासदार समीर भुजबळ यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मुदतवाढ देण्यास मागणी केली होती. त्यानुषंगाने खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान/भरडधान्य खरेदीकरिता शेतकऱ्यांच्य नोंदणी प्रकियेला दि.३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शेतकरी नोंदणीस देण्यात आलेल्या मुदतवाढ कालावधीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन शेतकऱ्यांच्या नोंदणीची कार्यवाही करावी,असे अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सूचित केले आहे. खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये धान व मका,ज्वारी,रागीसह भरड धान्य खरेदीसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणी पूर्ण केलेल्या पात्र शेतकऱ्यांकडूनच शासनामार्फत आधारभूत किंमतीने धान्याची खरेदी करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार, शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून शेतकऱ्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील धान व मका, ज्वारी, रागीसह भरड धान्य उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून अधिकाधिक शेतकऱ्यांना शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेता येणार आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह आपली ऑनलाईन नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन माजी खासदार समीर भुजबळ यांच्याकडून करण्यात आले आहे.

## प्रशासकीय यंत्रणांनी अतिरिक्त मनुष्यबळासाठी आवश्यक सेवा-सुविधाचा आराखडा १५ जानेवारीपर्यंत सादर करावा : आयुक्त शेखर सिंह

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक, दि. ३१ डिसेंबर २०२५ (जिमाका वृत्तसेवा) :नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा यशस्वी व सुरळीत पार पाडण्यासाठी विविध शासकीय यंत्रणांना अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सर्व प्रशासकीय यंत्रणांनी या अतिरिक्त मनुष्यबळासाठी कुंभ कालावधीत लागणाऱ्या आवश्यक सेवा- सुविधांचा अंदाजित आराखडा १५ जानेवारी २०२६ पर्यंत सादर करावा, असे निर्देश कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण सभागृहात आयोजित बैठकीत आयुक्त श्री. सिंह बोलत होते. यावेळी महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे, आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर,

(पान २ वर)

## माजी खासदार समीर भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आज येवल्यात नगराध्यक्ष व नगरसेवकांचा पदग्रहण सोहळा

**पदग्रहण सोहळ्यानंतर येवला शहरात स्वच्छता मोहीम**

**नाशिक लोकशास्त्र...**

**येवला, दि. ३१ डिसेंबर :-** येवला नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्र लोणारी व नगरसेवकांचा पदग्रहण सोहळा गुरुवार, दि.१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता येवला नगरपालिकेत पार पडणार आहे. या पदग्रहण सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे स्टार प्रचारक माजी खासदार समीर भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून नगराध्यक्ष व नगसेवक नव्या कारकिर्दीची औपचारिक सुरुवात करणार आहे. या सोहळ्यानंतर लगेचच संपूर्ण येवला शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

यावेळी माजी आमदार मारोतीराव पवार, ज्येष्ठ नेते अंबादास बनकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे,माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मायावती पगारे,ज्येष्ठ नेते अरुण मामा थोरात, संभाजी पवार, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, माजी नगराध्यक्ष हुसेन शेख, भाजप नेते प्रमोद सस्कर,बंडू क्षीरसागर,महिला शहराध्यक्ष राजश्री पहिलवान, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा महामंत्री आनंद शिंदे,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते राजेश भांडगे,दत्ता निकम, सनी पटनी, भाजप नेते धनंजय कुलकर्णी, सुभाष पाटोळे, मनोज दिवटे, भाजप युवा जिल्हाध्यक्ष समीर समदडीया, शहराध्यक्ष मीनानाथ पवार यांच्यासह ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

या पदग्रहण सोहळ्याची सुरुवात येवला शहरातील विंचूर चौफुली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून करण्यात येणार आहे. समता,स्वाभिमान,राष्ट्रनिर्माण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांवर आधारित कारभार करण्याचा संकल्प नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यावेळी करणार आहे.

राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली येवला नगरपालिका निवडणुकीत नगराध्यक्षपदासह १५ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व भाजप युतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली येवला शहरात विकासाची दिशा ठरवली जात असून येवला शहराच्या भविष्याचा विचार करून दिलेल्या वचननाम्याची पूर्ती करण्यासाठी प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच येवला शहराच्या सर्वांगिण विकासासाठी नगरपालिकेने केंद्रस्थानी जनता असलेली धोरणे राबविली जाणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, भाजप मित्रपक्षांच्या वतीने वचननाम्यात स्वच्छ सुंदर येवला असा संकल्प करण्यात आला होता. त्यानुसार पदग्रहन सोहळा संपन्न होताच संपूर्ण येवला शहरात एकाच वेळी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. शहरातील सर्व घनकचरा जेसीबी, ट्रॅक्टर, डम्परच्या सहायाने घनकचरा प्रकल्पात हलविण्यात येऊन येवला स्वच्छ सुंदर करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे.

# लाल कांद्याचे दर टिकवण्यासाठी लासलगाव बाजार समितीचा पुढाकार; रेल्वे महाप्रबंधकांकडे 'रॅक'ची मागणी : बाजार समिती सभापती डि.के.जगताप

**नाशिक लोकशास्त्र...**

**ऋषीकेश जोशी, लासलगाव :** आशिया खंडातील कांद्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत उन्हाळ कांद्याची आवक आता पूर्णपणे संपुष्टात आली असून, बाजार आवारात नवीन लाल कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक सुरू झाली आहे. मात्र, लाल कांद्याची आवक वाढल्यामुळे दररोज बाजारभावात मोठी चढ-उतार पाहायला मिळत असून, यामुळे उत्पादक शेतकरी चिंतेत सापडला आहे. उन्हाळ कांद्याप्रमाणे लाल कांद्याचे दर कोसळू नयेत आणि शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा, यासाठी बाजार समितीचे सभापती डी. के. जगताप यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. देशांतर्गत बाजारपेठेत नाशिकच्या लाल कांद्याला मोठी मागणी असते,



परंतु हा कांदा लवकर खराब होत असल्याने त्याची वेळेवर वाहतूक होणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रातील कांदा परराज्यातील बाजारपेठांमध्ये जलदगतीने पोहोचल्यास स्थानिक बाजारपेठेतील आवकेचा दबाव कमी होऊन भाव स्थिर राहण्यास मदत होऊ शकते. हीच बाब लक्षात घेऊन सभापती ज्ञानेश्वर जगताप यांनी नुकतीच मुंबई येथे मध्य रेल्वेचे महाप्रबंधक (जी.एम.) विवेक गुप्ता यांची भेट घेतली. यावेळी जगताप यांनी गुप्ता यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि कांदा वाहतुकीसाठी रेल्वेच्या मालगाड्या (रॅक) तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा केली. सध्या रस्ते वाहतुकीपेक्षा रेल्वेद्वारे कांदा पाठवणे अधिक सोयीचे आणि फायदेशीर ठरत असल्याने, जास्तीत जास्त रॅक उपलब्ध झाल्यास कांदा मोठ्या प्रमाणावर परराज्यात पाठवता येईल. यामुळे व्यापाऱ्यांना मालाची उचल करणे सोपे होईल आणि परिणामी शेतकऱ्यांना अधिकचा बाजारभाव मिळू शकेल, असा विश्वास बाजार समिती प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे. रेल्वे प्रशासनाने या मागणीवर सकारात्मक विचार करावा, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली असून, या भेटीमुळे आता लाल कांद्याच्या वाहतुकीला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

***




# नवे वर्ष : आपणच आपल्यात बदल करण्याची संधी चला पुन्हा नव्याने सुरवात करूया ...



सौ.ललिता रामदास गाढवे

**नाशिक लोकशास्त्र ....**
**सागर निकाळे, निफाड प्रतिनिधी –**

**सरत्या वर्षाच्या गोष्टींना**
**नको पुनः रुपी उजाळा**
**येणारे वर्ष आनंदी यावे**
**व्हावा सुखमयी सोहळा..!**

नवे वर्ष खरतर पाश्चात्य पद्धतीचे तरी आपण तेवढ्याच आनंदाने जल्लोषात सगळेच साजरा करतो..

बघता बघता वर्षाचा शेवटचा दिवस..वर्ष बदलले तरी दिवस वार तेचं असतात...आयुष्य असच वर्षासारखं हातातून निसटून जातं..पण नवीन वर्ष आपण कवेत घेत पुढील वाटचाल करतो.. पुन्हा नव्या जोमाने स्वप्नांना रंग देत जगण्यासाठी तयार होतो.. नवीन वर्षाच्या सुरुवातीला आपल्या आयुष्याकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन आपण ठेवायचा आयुष्याची जुनी पानं फाडून नवीकोरी जोडत जायची कॅलेंडरचे पान बदलणे म्हणजे केवळ तारीख बदलणे नव्हे, तर ती स्वतःला बदलण्याची, जुन्या चुकांमधून शिकण्याची आणि पुन्हा एकदा नव्याने उभारी घेण्याची एक सुवर्णसंधी असते. नवीन वर्ष हे एका 'कोऱ्या पुस्तकासारखे' असते त्यामध्ये आपण काय भरायचे हे सर्वस्वी आपल्यावर निर्भर आहे.. नको ते सोडा हवं ते गरजेचे ओंजळीत वेचून घ्या..भविष्याचा वेध घेत भूतकाळातील गोष्टीना तिलांजली देत नवीन दिवसांचे स्वागत करायचे..गेल्या वर्षात आपण अनेक चढ-उतार पाहिले असतील. काही यशाचे गोड क्षण असतील, तर काही अपयशाच्या झळा. काही छोटे मोठे अनुभव असतील पण अनुभवांनी माणूस शहाणा बनतो.. जगणं वागणं शिकतो..आयुष्यात सुख दुःख ही ऊन सावली सारखी आहेत ते जीवनाचा खरतर एक अविभाज्य घटक आहेत.. सुख दुःख ती चालूच राहणार.. आयुष्याचा प्रवास म्हटल्यावर वळणं लागणार फक्त त्यावर चालताना जबाबदारीने ती अनुभवांनी पावलं टाकतं जायची... तेचं तेचं रटाळवणे जीवन न जगता त्यात गुंतून न राहाता येणारा प्रत्येक दिवस नवीन अनुभव देऊन जातो फक्त कोणत्या क्षणांना आपल्यात सामावून घ्यायचे नको ते क्षण कसे सोडून द्यायचे हे आपल्यावर निर्भर आहे...

जुन्या वर्षातील काही नको त्या घडामोडी ती नकारात्मकता मागे सोडून, त्यातून मिळालेला धडा सोबत घेऊन पुढे जाणे आणि नव नवे जीवनासाठी संकल्प करणे ते सिद्धीस घेऊन जाणे इतके तरी आपल्या हातात आहे.. आजकाल सोशल मीडिया डिजिटल वर जास्त भर देत जगणं विसरलो..स्क्रीनवर जास्त वेळ घालवतो. इतरांना सांगा की, मोबाईल बाजूला ठेवून माणसांशी समोरासमोर बोलून कुटुंबाला वेळ दिला तर खऱ्या नात्यांमधील ओलावा टिकवून राहतो.. कुटुंबाला नात्यांना वेळ द्या.. त्यांना प्रेमाने विश्वासाने नातं घट्ट बनवा..मैत्र मैत्रिणी बरोबर संवाद साधत चला. मोबाईल मधे आपला वेळ घालवत सवयीची आहारी गेलोत तोच जीवनात जर बदल घडवायचा असेल तर ती मर्यादा पाळणे आपल्या हातात आहे स्वतःसाठी आपल्या स्वास्थ्य साठी वेळ काढणे गरजेचे आहे..

ज्ञानाची क्षितीजं विस्तारण्यासाठी पुस्तकांशी मैत्री करा.

वाचन वाढवा एकमेकांविषयी कृतज्ञता: व्यक्त करा..

एक ठराविक ध्येय निश्चित करा वाचन गायन खेळ आणि इतर आवश्यक गोष्टीना वेळ देत चला.. कारण जगण्याची कला ही प्रत्येकाला अवगत असते .. तिचा विस्तार करण्यासाठी मनाशी निश्चय पक्का करा.. आपण भूतकाळाचे ओझे सतत बाळगत तो अनेकदा भूतकाळ आठवत आजचे जगायचे विसरून जातो. हे नवीन वर्ष आपल्याला हीच शिकवण देते की, प्रत्येक क्षण मोकळेपणाने जगा... छोटे खाणी आनंद घेत देत चला..इतरांना आपल्यात सामावून घेताना कुणी आपल्यामुळे दुखावू नये ही काळजी घेत चला.. आणि वेळ मिळेल तसे निसर्गाशी सलग्न व्हा कारण निसर्गामुळे आज आपण आहोत..जीवनात संतुलन आणि समन्वय साधणेनिसर्गातील प्रत्येक घटक एकमेकांवर अवलंबून असतो, जे सहकार्य आणि संतुलनाचे महत्त्व शिकवते. कामासोबत आराम करणे हेही निसर्ग शिकवतो...निसर्गाकडून ऊर्जेचा स्त्रोत भरभरून घ्या कारण त्या सारखं निस्वार्थी कोणी नाही.. आज शेवटच्या दिवसाचा डोंगराआड चाललेला सूर्य उद्या आपल्या स्वागतासाठी पुन्हा एक नवीन ऊर्जा घेऊन येईल. भूतकाळात जे चिंतेने काळजीने घडून गेलेला तो काळ त्या गोष्टीना पुनःरुपी आता उजाळा नको..उद्या नवा दिवस नव्या क्षणांना जोडत पुनःरूपी उदयास येईल..शेवटचा दिवस आनंदाने साजरा करूया.रंगासारखे एक नवं क्षितिज निर्माण करूया. जीवनाचा रंगीन उत्सव करत सकारात्मक ऊर्जेसाठी तो बदल घडविण्यासाठी आपणच तयार राहून कडू आठवणींना मागे सारून नव्या प्रवासासाठी आपणच तयार राहुयात..

अश्याच या रंगबीरंगी जीवनाच्या नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...

**– लेखिका : सौ.ललिता रामदास गाढवे**

# मोठ्या प्रमाणावर लवचिकता निर्माण करणे : २०२६ साठी भारताच्या पीक संरक्षण धोरणाची पुनर्रचना

## – मुख्य कार्यकारी अधिकारी – पीक संरक्षण व्यवसाय, गोदरेज ग्रोव्हेट लिमिटेड राजवेलू एनके

**नाशिक लोकशास्त्र ....**

भारतातील पीक संरक्षणाचे स्वरूप मूलभूतपणे बदलले आहे – पिके वाचवण्यापासून ते हवामानातील अस्थिरता, मजूर टंचाई आणि जमिनीच्या लहान तुकड्यांच्या पार्श्वभूमीवर अन्नसुरक्षा निश्चित करण्यापर्यंत हा बदल झाला आहे. गेल्या वर्षभरात ज्या काही घडामोडी घडल्या आहेत, ती केवळ तात्पुरती केलेली तडजोड नव्हती तर ते एक संरचनात्मक परिवर्तन आहे, जे २०२६ मध्ये या क्षेत्राची दिशा निश्चित करेल.

२०२५ मध्ये सातत्याने हवामानातले तीव्र बदल दिसले. या बदलांमुळे कीटकांचा प्रादुर्भाव आणि प्रतिकारशक्तीचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला. ज्यामुळे शेतकऱ्यांना पारंपरिक फवारणीच्या पलीकडे जाऊन कीड व्यवस्थापन करणे आणि अचूक फवारणीचा अवलंब करावा लागला. 'ड्रोन दीदी'सारख्या सरकारी उपक्रमांमुळे लक्ष्यित पीक संरक्षणाला मुख्य प्रवाहात आणण्यास मदत झाली. यात १५,००० हून अधिक महिला बचत गट सहभागी झाले, तर सुमारे २० टक्के लहान शेतकरी एआय-आधारित कीटक सल्लागार प्रणालीचा लाभ घेऊ लागले.

एकत्रितपणे, हे बदल एका निर्णायक परिवर्तनाचे संकेत देतात- प्रतिक्रियात्मक पीक संरक्षणाकडून भविष्यवेधी, बुद्धिमत्ता-आधारित प्रणालींकडे – जेणेकरून २०२६ हे वर्ष एकात्मता, डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया आणि शाश्वतता हे भारताच्या पीक संरक्षण उत्क्रांतीच्या पुढील टप्प्याला परिभाषित करेल.

हवामानातील अस्थिरतेमुळे संरचनात्मक बदलांना चालना

हवामान बदलामुळे तण आणि कीटकांची गतिशीलता मोठ्या प्रमाणात बदलते आहे. उष्णतेचा ताण, सततची आर्द्रता



आणि अनियमित पर्जन्यवृष्टीमुळे पारंपरिक तण नियंत्रण तंत्रे निरुपयोगी ठरत आहेत. जे शेतकरी कीटकनाशकांचा अधिक आणि वारंवार वापर करतात, त्यांना घटत्या उत्पन्नाचा आणि कीटकनाशक प्रतिकारशक्ती निर्माण होण्याचा धोका असतो, हे एक दुष्टचक्र आहे. हे थांबवण्यासाठी नवीन दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. यासाठी पीक संरक्षणाने आता व्यापक अनुकूलन यंत्रणांचा वापर केला पाहिजे: आळीपाळीने पिके घेणे, एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि योग्य ठिकाणी योग्य मात्रेत योग्य उत्पादनाचा वापर करणे, समाविष्ट आहे.

छोटे शेतकरीच यश निश्चित करतील

भारतातील छोटे शेतकरी, जे शेतीचा कणा आहेत, ते मर्यादित भांडवल आणि किमान समर्थनासह काम करतात. नव्याने एक डिजिटल यंत्रणा देखील उदयास येते आहे, ज्यात ६०-७० टक्के लोक एसएमएस, व्हॉट्सऍप आणि स्थानिक ऍप्सद्वारे हवामान आणि कीटकांच्या सूचना मिळवतात. केवळ २० टक्के लोक एआय प्लॅटफॉर्म वापरात असले तरी अशी मदत घेणारे संख्येने जास्त आहेत. ही साधने पेरणीपासून ते फवारणीच्या वेळापत्रकापर्यंतच्या महत्त्वपूर्ण निर्णयांबाबत मार्गदर्शन करतात. यामुळे शेतकऱ्यांची मोठीच सोय होते आहे. पीक-विशिष्ट सल्लागार, एकत्रित उपाय, आपल्या भाषेतून मदत आणि व्यावहारिक देखरेख, योग्य डोस, संरक्षणात्मक उपकरणे आणि साठवणूक देखील महत्त्वाची आहे. डिजिटल चॅनेल तसेच प्रत्यक्ष शेतावरील प्रात्यक्षिके योग्य, सुरक्षित प्रयोगांची खात्री देतात.

बनावट उत्पादने विश्वास गमावतात, यंत्रणा आणि परिसंस्थांना कमकुवत करतात

बनावट आणि निकृष्ट दर्जाची कीटकनाशके शेतीला गंभीर धोका निर्माण करतात. भारतातील कीटकनाशक बाजारापैकी अंदाजे २५ टक्के भाग हा बनावट उत्पादनांचा आहे. यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास राहात नाही. मार्केटमधील वातावरण ढवळून निघते. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पर्यावरणीय धोके निर्माण होतात. ही समस्या दूर करण्यासाठी समन्वयाची आवश्यकता आहे. सरकारी अंमलबजावणी, किरकोळ विक्रेत्यांची जबाबदारी, पॅकेजिंगवर लक्ष आणि शेतकऱ्यांचे शिक्षण या सर्वांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

भविष्य: बुद्धिमत्ता-आधारित एकात्मिकरण

नवनवीन शोध नवनवीन पद्धतींना नव्याने आकार देत आहेत. यांत्रिकीकरण योजनांद्वारे ड्रोन फवारणीला सरकारी मंजुरी मिळणे ही एक महत्त्वाची घडामोड आहे. अचूक डोस, योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी फवारणी करून ड्रोन पाण्याचा वापर तसेच ऑपरेटरचा धोका कमी करतात. त्याच वेळी, एआय-आधारित कीटक निरीक्षण प्रणाली आणि उपग्रह-आधारित सल्ले या फवारणीला प्रतिक्रियात्मक दृष्टिकोनातून भविष्याकडे नेत आहेत. मशीन लर्निंगवर आधारित राष्ट्रीय कीटक देखरेख यंत्रणा म्हणजे या उत्क्रांतीचे उत्तम उदाहरण आहे.

ड्रोनचा अवलंब, कीटकांकडे लक्ष आणि बनावट उत्पादनांवर नियंत्रण या संक्रमणामध्ये सार्वजनिक-खासगी भागीदारीचा मोठा वाटा आहे. शेतीमधील आव्हाने ही केवळ एका शेतकऱ्यापुरती मर्यादित नसतात तर ती संपूर्ण व्यवस्थेवर परिणाम करणारी असतात, याची जाणीव लवकर झाली की अनेक प्रश्न ताबडतोब सुटतात.

भारताचे पीक संरक्षण सध्या एका निर्णायक टप्प्यावर आहे. हवामानाचा ताण, प्रतिकाराचे धोके आणि लहान शेतकऱ्यांच्या मर्यादा अशी मोठी आव्हाने आहेत. तरीही, विज्ञान, तंत्रज्ञान, नियम आणि शेतकरी-केंद्रित दृष्टिकोन योग्य आणि व्यवहार्य मार्ग दाखवतात. २०२६ मध्ये मिळणारे यश हे वापरलेल्या प्रमाणावरून नव्हे, तर परिस्थिती स्वीकारून त्यावर मात कशी केली जाते, यावरून मोजले जाईल. येत्या दशकांमध्ये भारत माती, परिसंस्था आणि शेतकऱ्यांची उपजीविका जपून आपल्या पिकांचे संरक्षण करू शकेल की नाही, हे कठोर अंमलबजावणी आणि नाविन्यपूर्णतेवर आधारित अचूकता, सर्वसमावेशकता आणि शिक्षण, अनुभव यावरून ठरेल.

****

# प्रशासकीय यंत्रणांनी अतिरिक्त मनुष्यबळासाठी आवश्यक सेवा-सुविधाचा...



(पान १ वरून) महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.चारूदत्त शिंदे, आरोग्य सहाय्यक संचालक डॉ. योगेश चित्ते, विभागीय वाहतूक अधिकारी किरण भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ प्रशांत शेटे, तहसीलदार प्रदीप वर्पे, इंडियन सिक्युरिटी प्रेसचे व संयुक्त महाप्रबंधक शैलेश अवचट, उप महाप्रबंधक अर्पित धवन यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त श्री सिंह म्हणाले की, प्रत्येक शासकीय विभागाने जिल्ह्याबाहेरून तैनात करण्यात येणाऱ्या मनुष्यबळासाठी त्यांचे निवास, जेवण-पाणी व्यवस्था, वाहतूक, आवश्यक वैद्यकीय सुविधा, व इतर कल्याणकारी बाबींचा सूक्ष्म विचार करून नियोजन करावे. विहित नमुन्यात आराखडा सादर करताना जिल्ह्यातील, जिल्ह्याबाहेरील, पदनिहाय वर्ग १ ते ४ या श्रेणीनुसार, आगमनाचा दिनांक, मुक्कामाचा कालावधी, मुक्कामाचे ठिकाण, तैनातीचे ठिकाण यानुसार माहिती सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक विभागाने तैनात करण्यात येणाऱ्या अतिरिक्त मनुष्यबळांचे शहरातील स्थळे निश्चित करावीत. त्यांच्या रहिवासाच्या व्यवस्थेसाठी मंगल कार्यालये, धर्मशाळा, आश्रम यासारख्या संस्थांना प्रत्यक्ष भेट देवून तेथील उपलब्ध सेवा-सुविधांची पाहणी करूनच ती निश्चित करावीत. ज्या ठिकाणी २ हजार पेक्षा कमी मनुष्यबळ वास्तव्यास राहणार आहेत त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक दिवशी फिरत्या बाह्यरूग्ण शिबिराची व्यवस्था करावी व ज्या ठिकाणी ५ हजार पेक्षा जास्त मनुष्यबळ वास्तव्यास राहणार आहे त्याठिकाणी कायमस्वरूपी आरोग्य यंत्रणा कार्यरत ठेवण्याबत त्यांनी सूचित केले.

पोलिस विभागासाठी जिल्ह्याबाहेरून येणाऱ्या मनुष्यबळासाठी पावसाळा कालावधीत रेनकोट व सहसाहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक दायित्व निधीसाठी प्रयत्न करावेत. तसेच कुंभ पर्वणी काळात या मनुष्यबळाची वाहतुक व्यव्यस्थेचेही नियोजन करण्यासह आरोग्य सेवा, दोन्ही वेळेच्या भोजनासाठी मध्यवर्ती स्वयंपाकघर, निवासस्थांनाच्या ठिकाणी वेळेत भोजन पोहचविण्याची व्यवस्था यांचे चोख नियोजन करण्याच्या सूचना आयुक्त श्री. सिंह यांनी यावेळी दिल्या.

मनुष्यबळाच्या निवासासाठी इंडिया सिक्युरिटी प्रेसचे नेहरूनगर येथे असलेले रिक्त असलेल्या निवासस्थानाच्या दुरूस्तीबाबत व ही निवासस्थाने तात्पुरत्या स्वरूपात सुपूर्द करण्यात बाबतच्या आवश्यक परवानग्या याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

००००००

सायंदैनिक 'नाशिक लोकशास्त्र' हे वृतपत्र मालक, प्रकाशक, संपादक भाऊसाहेब मधुकर हुजबंद यांनी मुद्रक – विकास प्रिंटिंग अँड कॅरियर्स प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्रमांक ३२, सकल सर्कल, एमआयडीसी सातपूर, त्र्यंबक रोड, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००७.येथे मुद्रित करून फ्लॅट क्र. १५, श्रीहरी दर्शन अपार्टमेंट, डोंगरगाव रोड, विंचूर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२३०५. येथे प्रकाशित केले. (या अंकात व्यक्त झालेल्या जाहिरात, लेख, बातम्यांसाठी संपादक, प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही. निफाड न्यायालयीन कक्षेत. (मो. ८९९९९२१९९४) PRGI No. MHMAR/25/A4847

# ५३ वे येवला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे पारितोषिक वितरण संपन्न

**नाशिक लोकशास्त्र ....**

**एकनाथ भालेराव, येवला** ता.३० – शिक्षण विभाग पंचायत समिती येवला, येवला तालुका विज्ञान अध्यापक संघ व मविप्रचे जनता माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज गवंडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे येवला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५ चा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवार दि.३० रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर होते. यावेळी मविप्रचे येवला तालुका संचालक तथा कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष नंदकुमार बनकर, शिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, महेंद्रशेठ काले, किसनराव धनगे, मविप्र सभासद साहेबराव सैद, माधवराव पवार, नंदा सोळुंके, मनिषा वाकचौरे, दिपक गायकवाड, संग्राम सानप, बाळासाहेब वाबळे,भाऊलाल कुडके, सुनील गायकवाड, अर्जुन कोकाटे, डॉ. अमृतसा पहिलवान, नवनाथ शिंदे, चंद्रशेखर दंडगव्हाळ, नारायण डोखे, राजेंद्र पाखले, मुख्याध्यापक आर.सी.महाले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात स्वागतगीत, सरस्वती पूजन, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमांचे प्रतिमापूजन, दिप प्रज्वलन करून झाले. यावेळी मविप्रचे येवला तालुका संचालक नंदकुमार बनकर, परिक्षक एल.एन.शेळके, नवनाथ शिंदे,



टि.व्ही.भागवत,संजय भागवत, प्राचार्य रामदास महाले, सुनील गायकवाड,संग्राम सानप आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन संतोष कापसे, श्रीम. गायकवाड यांनी केले.आभार प्राचार्य आर.सी.महाले यांनी मानले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की जगात कोणत्या देशात काय होते हे आपल्याला मोबाईल चालू केला तर गुगलच्या मार्फत आपण शोधू शकतो. कोणत्याही विषयाची माहिती मिळते ती शास्त्रज्ञांचा व तंत्रज्ञानाचा मोठा वाटा आहे. त्यांनी जर संशोधन केलं नसतं ही प्रगती आपण करू शकलो नसतो. एक दिवसात कोणत्याही देशांमध्ये पोहोचतो हे संशोधन तंत्रज्ञाने शास्त्रज्ञांच्या प्रगतीचे हे लक्षण आहे. म्हणून जगामध्ये पुढे जायचं असेल किंवा प्रगती करायची असेल तर असे वैज्ञानिक तयार झाले पाहिजे. त्या दृष्टीने या ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा कुठे मागे राहता कामा नये.कृषी, शैक्षणिक व वैद्यकीय अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे राहता कामा नये यासाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. ग्रामीण भागातले विद्यार्थी सुद्धा चांगले नवीन नवीन प्रयोग विज्ञान प्रदर्शनात सादर करतात.त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुद्धा त्या पद्धतीचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले पाहिजे.

**५३ वे येवला तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन**

१) इयत्ता ९ ते १२ वी उपकरण माध्यमिक विभाग- प्रथम ऊर्ल ीं –ल जनरेटर(न्यू.इं.स्कूल भारत), द्वितीय स्मार्ट डस्टबीन (शिरसगाव), तृतीय हार्वेस्टिंग ड्रिंक वॉटर(नगरसूल), उत्तेजनार्थ दातांद्वारे श्रवण यंत्र (अंगणगाव).

२) इयत्ता ६ ते ८ वी उपकरण प्राथमिक विभाग– प्रथम बिबट्या पासून संरक्षण (गवंडगाव), द्वितीय स्मार्ट सिटी (उंदिरवाडी), तृतीय इझी कलर पंप(राजापूर), उत्तेजनार्थ रियुज ऑफ वॉटर(नगरसूल).

३) इयत्ता ९ ते १२ वी उपकरण माध्यमिक विभाग दिव्यांग – प्रथम कांदा कापणी यंत्र (सावरगाव), द्वितीय व्हेईकल स्पीड बेस जनरेटर (गवंडगाव), तृतीय कचऱ्यापासून वीजनिर्मिती (देशमाने), उत्तेजनार्थ वेट पासर ट्रॉली (मुखेड).

४) इयत्ता ६ ते ८ वी उपकरण प्राथमिक विभाग दिव्यांग – प्रथम सिक्युरिटी सिस्टीम (अनेकाई), द्वितीय क्सिडेंट प्रोटेक्टर(मुखेड).

५) पूर्व प्राथमिक गट उपकरण– प्रथम जी.पी.गॅझेट गर्ल (अंदरसुल), द्वितीय ग्रीन एनर्जी (बनकर पाटील अंगणगाव), तृतीय मॅथ पार्क ( सोनवणे अंदरसुल), उत्तेजनार्थ बिबट काठी(सायगाव).

६) शैक्षणिक साहित्य प्राथमिक –प्रथम मॅथेमॅटीक टिचिंग मॉडेल (आत्मा मालिक पुरणगाव), द्वितीय टोमॅटिक व्हील ( सोनवणे अंदरसुल), तृतीय स्पर्धा परीक्षा जादु यंत्र (आंबेगाव), उत्तेजनार्थ गणितीय खेळातून अंकाचा प्रवास (मुरमी).

७) शैक्षणिक साहित्य माध्यमिक –प्रथम मनोरंजन गणितीचा मॉडेल ( सोनवणे अंदरसुल), द्वितीय मॅथ मधील पार्क (आत्मा मालिक पुरणगाव) तृतीय सायन्स आणि मॅथ मॉडेल (गवंडगाव), उत्तेजनार्थ पायथागोरस जादू (मुखेड).

८) शैक्षणिक साहित्य प्रयोगशाळा सहाय्यक/परिचर–प्रथम ट्रॅव्हलींग प्रयोगशाळा (आत्मा मालिक पुरणगाव), द्वितीय ब्लड ग्रुप इंडिकेटर (शांताबाई सोनवणे विद्यालय अंदरसुल), तृतीय चुंबकीय बल( सोनवणे विद्यालय अंदरसुल),

परिक्षक –श्रीम.एस.बी.पानगव्हाणे, ए.आर. बोरसे, एल.एन.शेळके, बी.के. देवरे, एम.व्ही.पाटील, एन.के.भामरे आदी.

***

## एम.एस.जी.एस.इंग्लिश मिडीयम स्कूलची श्रेया शिंदेची सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड



**नाशिक लोकशास्त्र ....**

**सुनिल गायकवाड, सुरेगाव रस्ता ता. येवला – :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र शासन आयोजित विभागीय थाई बॉक्सिंग स्पर्धा जळगांव येथे पार पडल्या. त्यात मातोश्री शांताबाई गोविंदराव सोनवणे इंग्लिश मिडीयम स्कूलची श्रेया किरण शिंदे हिने विभागीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक (सुवर्ण पदक) पटकावला व श्रेया किरण शिंदेंची निवड १७ जानेवारी २०२६ रोजी सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी करण्यात आली. एम.एस.जी.एस.इंग्लिश मिडीयमच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा रोवला गेला. तसेच चैतन्य गणेश सोनवणे, ओम सुरेश वाघ व श्रुती दत्तू शिंदे या विद्यार्थ्यांनी विभागीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत द्वितीय क्रमांक (रजत पदक) पटकावला.सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक राजेश कांबळे, साक्षी देशमुख व प्रिन्सिपल अल्ताफ खान यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच विद्यार्थ्यांच्या या यशबद्दल अंदरसूल शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण भांडगे, उपाध्यक्ष सुदाम सोनवणे, सरचिटणीस अमोल सोनवणे, खजिनदार मकरंद सोनवणे, सहचिटणीस मयुर सोनवणे, प्रशासकीय अधिकारी प्रा.आर.बी. गायकवाड, जीवन गाडे, डॉ.भागीनाथ जाधव, उज्ज्वल जाधव, राजेंद्र सोनवणे, आकाश सोनवणे, जनार्दन जानराव, सौ.संगीताताई सोनवणे, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्या सौ. विनीताताई अमोल सोनवणे, प्रिंसिपल अल्ताफ खान, प्राचार्य सचिन सोनवणे, मुख्याध्यापिका जयश्री परदेशी, प्राचार्या डॉ.सुवर्णा कडलग, शिक्षक अमोल आहेर, अजहर खतीब, दीपक खैरनार, गणेश सोनवणे, सचिन घोडके, अजीम पटेल, माधुरी माळी, अर्चना एंडाईत, निलिमा देशमुख, शर्मिला पवार, सुनिता वडे यांनी अभिनंदन केले व १७ जानेवारी रोजी सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थाई बॉक्सिंग स्पर्धेसाठी श्रेया शिंदेला शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाचे प्रात्यक्षिकात रुपांतर केल्यास विज्ञान अधिक प्रगत होईल : सौ शेफालीताई भुजबळ

### गवंडगाव येथे ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

**नाशिक लोकशास्त्र ....**

**सुनिल गायकवाड, सुरेगाव रस्ता ता. येवला –** आज नवनवीन तंत्रज्ञान उदयाला येत आहे, ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी भागातील विद्यार्थ्यांपेक्षा वेगळा विचार करतात ,त्यांचेकडे नवनिर्मितीची कौशल्ये अधिक असतात. अशा विद्यार्थ्यांमुळे विज्ञान अधिक प्रगत होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाचे प्रात्यक्षिकात रूपांतर केल्यास विज्ञान अधिक प्रगत होईल. त्यासाठी खेडोपाडी विज्ञान प्रदर्शने भरविली जावीत असे प्रतिपादन मुंबई एज्युकेशन ट्रस्टच्या संचालिका सौ. शेफाली ताई भुजबळ यांनी केले. त्या येवला पंचायत समिती शिक्षण विभाग, तालुका विज्ञान अध्यापक संघ व जनता विद्यालय गवंडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित म.वि.प्र. संचलित जनता विद्यालय गवंडगाव येथे ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून उपस्थितां समोर बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्रचे माजी संचालक तथा ज्येष्ठ सहकार नेते अंबादास बनकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मविप्र संचालक तथा स्वागताध्यक्ष नंदकुमार बनकर, विश्वासराव आहेर, गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, माजी नगराध्यक्षा राजश्री पहिलवान, मकरंद सोनवणे, समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे, डॉ. अमृतसा पहिलवान, प्राचार्य रामदास महाले आदी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक येवला पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर यांनी केले. यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते हवेत बलून सोडून तसेच प्रदर्शन कक्षाचे फीत कापून



उद्घाटन करण्यात आले .छत्रपती शिवाजी महाराज व वैज्ञानिक डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमांचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आलेल्या अतिथींचे गीत गायनाने स्वागत केले. तसेच सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी प्राचार्य टी.व्ही. भागवत, विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष संग्राम सानप, प्राचार्य आर.सी. महाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात अंबादास बनकर यांनी आपल्या देशाने केलेल्या वैज्ञानिक प्रगतीचा आढावा घेवून सध्या सौर ऊर्जेमुळे शेतकऱ्यांची विजेची टंचाई कशा प्रकारे दूर झाली ही बाब विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कापसे यांनी केले. प्रदर्शनात येवला तालुक्यातील विविध प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या नवनवीन कल्पनांचा अविष्कार करणाऱ्या प्रतिकृतींची मांडणी केली. प्रमुख अतिथींनी या सर्व उपकरणांची व प्रतिकृतींची पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. याप्रसंगी दिलीप खोकले, नामदेव भागवत, संजय भागवत, अण्णासाहेब भागवत, शिक्षण विस्तार अधिकारी नंदा सोळुंके,मनीषा वाकचौरे, दीपक गायकवाड, ,गोरख भागवत, सरपंच भारतीताई भागवत, अहीलाजी सोमवंशी, व्ही.एल.भागवत, ग्रामसेविका कविता कळमकर, अशोक गायकवाड, अर्जुन घोडेराव ,नितीन भागवत प्रमोद भागवत, आप्पासाहेब भागवत, रामदास भागवत ,रामेश्वर भागवत, चंद्रशेखर दंडगव्हाळ, केंद्रप्रमुख नारायण डोखे ,मुख्याध्यापक नवनाथ शिंदे, प्राचार्य राजेंद्र पाखले,प्राचार्य महेन्द्र भगत, दिलीप खताळ ,गंगाधर पवार, रविंद्र थळकर ,सुधीर आहेर, सुभाष जाधव आदींसह तालुक्यातील विविध विद्यालयाचे मुख्याध्यापक ,तालुका विज्ञान अध्यापक संघाचे पदाधिकारी,शालेय समितीचे सदस्य, म.वि.प्र. सभासद, ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री महावीर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनात सादर केले विविध कलाविष्कार

## सौ. शेफालीताई भुजबळ यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन







**नाशिक लोकशास्त्र...**
**ऋषीकेश जोशी, लासलगाव/ प्रतिनिधी –**

लासलगाव येथील श्री महावीर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रम्हेचा यांनी भूषविले. या कार्यक्रमाचे उदघाटन नाशिक येथील भुजबळ नॉलेज सिटीच्या संचालिका शेफाली भुजबळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून लासलगाव ग्रामपालिकेच्या सरपंच योगिता पाटील, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका सुवर्णा जगताप, लासलगावच्या महिला दक्षता समितीच्या अध्यक्षा वेदिका होळकर, लासलगाव ग्रामपालिकेच्या मा. सदस्या श्वेता मालपाणी, महाराष्ट्र जैन महिला संघटनेच्या सदस्या सोनाली साबद्रा, सामाजिक कार्यकर्त्या प्रियंका डुंगरवाल , लासलगाव ग्रामपालिकेच्या सदस्या अमिता ब्रम्हेचा, लासलगाव ग्रामपालिकेच्या मा. सदस्या स्नेहल ब्रम्हेचा, सामाजिक कार्यकर्ते लोंढे नाना, संस्थेचे मानद सचिव शांतीलाल जैन, संस्थेचे खजिनदार अजय ब्रम्हेचा, संचालक मोहनलाल बरडिया, महावीर चोपडा, अमित जैन, सुनिल आब्बड आणि संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रम्हेचा, श्री महावीर कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय विकास समितीचे सदस्य संतोष ब्रम्हेचा, अक्षय आब्बड आणि श्री महावीर विद्यालयाच्या प्राचार्या पल्लवी चव्हाणके, श्री महावीर विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक शिवाजी धुमाळ, श्री महावीर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य शिरसाठ सर, श्री महावीर इंग्लिश मेडियम स्कूलच्या प्राचार्या वैशाली निकम मॅडम, आय.टी.आय.चे प्राचार्य साहेबराव हांडगे,जैन प्राथमिक शिक्षण मंदिरच्या मुख्याध्यापिका लिनिता अहिरे, वसतिगृहाचे अधीक्षक धनपाल कोल्हापुरे, विभागप्रमुख स्वप्निल मुसळे, राजेंद्र जैन आदी मान्यवर उपस्थित होते. प्रमुख अतिथींच्या हस्ते सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाचे संगीतशिक्षक सचिन आहेर सर व गीत मंचाने नवकार मंत्र व महावीर स्तवन सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक श्री महावीर विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक शिवाजी धुमाळ यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शेफाली भुजबळ, सुवर्णा जगताप, वेदिका होळकर जवाहरलाल ब्रम्हेचा, शांतीलाल जैन यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला व विद्यार्थ्यांना वार्षिक स्नेहसंमेलनाच्या शुभेच्छा दिल्या. वार्षिक स्नेहसंमेलनात इ.ते ५ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी आपले विविध कलाविष्कार सादर केले. यात विविध समूह नृत्यांचा समावेश होता.यात विद्यार्थ्यांनी जय जय शिवशंकर, लल्लाटी भंडार, माय भवानी,पिंगा, पंजाबी सॉन्ग, गरबा ...इत्यादी गीतांवर धमाल समूह नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक ज्ञानेश्वर मोहन ,उपशिक्षिका प्रियंका साळवे , त्रिवेणी जाधव यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री महावीर इंग्लिश मिडीयम च्या प्राचार्या वैशाली निकम यांनी केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, पालकवर्ग व संस्थेतील सर्व शाखांचे शिक्षक- शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

***

## कर्करुग्णांच्या मदतीसाठी 'आर.डी. वाइब्स – २' मैफल

**नाशिक लोकशास्त्र ...**

नाशिक (प्रतिनिधी) – येथील कलास्मृती फाउंडेशनतर्फे कर्करुग्णांना मदत करण्यासाठी एक चॅरिटी शो 'आर.डी. वाइब्स 'आयोजित करण्यात आला आहे. शुक्रवारी दि. २ जानेवारी २०२६ रोजी संध्याकाळी ५ वाजता कालिदास कलामंदिर येथे होणाऱ्या या मैफलीत संगीतकार आर.डी.बर्मन यांची सुप्रसिद्ध गाणी सादर करण्यात येणार आहेत. पार्श्वगायिका अमृता दहिवेलकर, सुरभी गौड, प्रियांका कोठावडे, नेहा आहेर, सारिका शिरुडे तसेच लोकप्रिय गायक अजय पाटील, जयदीप जाधव, दीपक दोडे सहभागी होणार आहेत. इंटरनॅशनल म्युझिक लव्हर्स ऑर्केस्ट्राचे संयोजन प्रशांत महाले करतील. ध्वनी व्यवस्था पवन वंजारी व तांत्रिक बाजू संजय गाडे सांभाळणार आहेत. नाशिककर रसिकांनी या उदात्त कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## जागतिक स्तरावरील मोठ्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करण्याची शक्यता– कमलेश राव

**नाशिक लोकशास्त्र...**

Sabse Pehle Life Insurance

नाशिक – ग्राहकहिताला प्राधान्य देणाऱ्या अशा काही ऐतिहासिक निर्णयांसाठी २०२५ हे वर्ष स्मरणात राहील, ज्याचा दूरगामी परिणाम म्हणून सार्वत्रिक सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या प्रक्रियेत जीवन विमा हा एक केंद्रबिंदू ठरेल. या वर्षाची सुरुवात सरेंडर व्हॅल्यूच्या नियमांमधील बदलाने झाली आणि त्यानंतर जीएसटी सवलत व बीमा सुगम पोर्टलचे सादरीकरण यामुळे या क्षेत्राच्या विकासाचा मार्ग अधिक प्रशस्त झाला.असे इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ)चे अध्यक्ष कमलेश राव म्हणाले.सध्या जीवन विम्याच्या मागणीचा कल प्रामुख्याने प्रोटेक्शन (संरक्षण), न्युइटी (निवृत्ती वेतन) आणि बचत उत्पादनांच्या दिशेने आहे. जसजशी भारतीय कुटुंबे स्वतःचे संरक्षण कवच आणि निवृत्तीपश्चात नियोजनाला महत्त्व देऊ लागतील तसतसे या उत्पादनांच्या माध्यमातून मिळणारी आर्थिक सुरक्षा अधिक प्रबळ होताना दिसेल. याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये विमा कंपन्या ग्राहकांच्या बदलत्या गरजा ओळखून अधिक नाविन्यपूर्ण आणि सर्वसमावेशक उत्पादने सादर करतील, अशी खात्री वाटते.इन्शुरन्स अवेअरनेस कमिटी (आयएसी-लाइफ) चे अध्यक्ष कमलेश राव पुढे म्हणाले,थेट परकीय गुंतवणुकीच्या नियमांमधील शिथिलतेमुळे आगामी वर्षात जागतिक स्तरावरील मोठ्या कंपन्या भारतीय बाजारपेठेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. नवीन कंपन्यांच्या आगमनामुळे या उद्योगातील समन्वयाला नवी गती मिळेल आणि जीवन विम्याचे पर्याय अधिक कार्यक्षमतेने सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवता येतील. पोषक नियामक वातावरण, डिजिटल तंत्रज्ञानातील प्रगती आणि ग्राहकांमधील वाढती जागरूकता या त्रिसूत्रीमुळे २०२६ मध्ये जीवन विमा क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि निरोगी वृद्धी अनुभवण्यास मिळेल.

## नव वर्षा मागणे एकची आता...

**नाशिक लोकशास्त्र ...**

बघता बघता हे ही वर्ष
सरले,
काही तासांवर नववर्ष येऊन
ठेपले,
मागे वळुन बघता लक्षात आले,
कटु आठवनिंच्या हिशोबाचे
ओझे तर सोबतच आले !

मग आज थोडा विसावलो,
जमाखर्च पुन्हा मांडु लागलो,
वाईट आठवनींचे पान फाडुनी,
चांगल्या क्षणांची बेरीज करु
लागलो !!

पाने फाडता कटु आठवणींचे,
वहीने देखिल मोकळा श्वास
घेतला,
ओझे मनावरचे कमी होतांना,
नविन प्रवासाचा उत्साह मनी
दाटला !!!

नुतन वर्षात हा ऊत्साह, आनंद
टिकुन रहावा,
स्वामी कृपेचा आपणा सर्वांवर
वर्षाव व्हावा,
नविन वर्षाकडुन एकची मागणे
आता,
केवळ मोबाईल टु मोबाईल च
नव्हे तर नात्यांचा व मैत्रीचा
एकमेकांशी 'हार्ट टु हार्ट 'ही
संवाद व्हावा !!!!



**– डॉ चंद्रशेखर सातभाई**

**नुतन वर्षाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा**

## सिंहस्थ कुंभमेळा २०२७ स्वच्छता मोहिमेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे - आयुक्त सिंह

**नाशिक लोकशास्त्र...**

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. हा कुंभमेळा स्वच्छ, हरित व पर्यावरणपूरक होण्यासाठी स्वच्छता अत्यंत महत्वाची आहे. ३ जानेवारी २०२६ रोजी त्र्यंबकेश्वर शहरातून या स्वच्छता मोहिमेचा प्रारंभ होत असून जास्तीत जास्त नागरिक, संस्था यांनी सहभागी होवून ही मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी केले.

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण सभागृहात आयोजित बैठकीत आयुक्त श्री. सिंह बोलत होते. यावेळी निमाचे अध्यक्ष आशिष नहार, क्रेडाईचे सचिव तुषार संकेलचा, जिल्हा शासकीय रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दयानंद देशमुख, त्र्यंबकेश्वर शासकीय औद्योगिक संस्थेचे प्राचार्य डॉ. एन बी गुरूळे, राहुल देशमुख, डॉ. प्रफुल्ल कांबळे, भुजबळ नॉलेज सिटी एमईटीचे प्रा. योगेश वानखेडे, प्रा. डॉ रणवीर कोरके, संदिप फाउंडेशनचे प्रा. डॉ.सुनील महाजन, नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिलचे सचिव शंतनु देशपांडे, स्वदेश फाउंडेशनचे बाळासाहेब माने, गुरू गोविंद सिंग महाविद्यालयाचे प्रा. दीपक पाटील, प्रा. गणेश वाघ, जीईएस ण्ड आर. एच सपट कॉलेजचे प्रा. डी. एस. चौधरी, हरित कुंभ समितीचे सदस्य संकेत मेढेकर यांच्यासह विविध महाविद्यालये, शिक्षण संथा, विविध सेवाभावी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. युक्त श्री. सिंह म्हणाले की, शनिवार ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता त्र्यंबकेश्वर शहरातून या स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ होणार आहे. या मोहिमेत संगम घाट व गौतम तलाव परिसर वेताळ महाराज मंदिर परिसर, आखाडा पार्किंग परिसर, निवृत्ती महाराज चौक, गौतम तलाव पूल येथे विशेष स्वच्छता करण्यात येणार आहे. या मोहिमेत शासकीय विभागांसह स्वयंसेवी संस्था , नागरी समाज संस्था व स्वयंसेवक गट, धार्मिक ट्रस्ट व सामाजिक संस्था, युवक व समुदाय-आधारित स्वयंसेवी संस्था, आरोग्य, पाणी, स्वच्छता व स्वच्छतागृह क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, महाविद्यालयीन स्वयंसेवक, विद्यार्थी समिती, रहिवासी कल्याण संघ व स्थानिक समुदाय स्वयंसेवक, ब्रह्मगिरी/त्र्यंबक परिसराला सहकार्य करणारे साहसी व ट्रेकिंग गट या सर्वांना सहभागी करून घेतले जाणार आहे. यापुढेही वेळोवेळी राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमांसाठी सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून निधी उपलब्धेसाठी संस्थाचे योगदान महत्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्वच्छ कुंभसाठी अशा प्रकाराच्या स्वच्छता मोहिमांचे आयोजन यापुढेही ठराविक कालावधीनुसार आयोजित केले जाणार आहेत. आपले शहर, आपला कुंभमेळा ही जाणीव मनात ठेवून मोहिमांच्या व्यापक प्रसिद्धीसाठी व नागरिक व संस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी माध्यमे व संवाद भागीदार, स्थानिक माध्यम संस्था, रेडिओ , डिजिटल प्रचार भागीदार यांचे सहकार्य अपेक्षित आहे. शहरातील महाविद्यालये व उद्योग संस्थांनी स्वयंस्फूर्तीने स्वच्छता व देखभालीसाठी एखादा घाट दत्तक घेतल्यास तेथे वेळोवेळी स्वच्छता राखणे सुलभ होईल.

***